महाराष्ट्र जनशक्ती | ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ७८ वा | दिनांक : १९/१२/२०२४ | वार : गुरूवार

## भाजपचे जुने प्लॅन अंमलात आणण्यासाठी बाबासाहेब अडसर : प्रकाश आंबेडकर



**दिल्ली :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या आंबेडकरांबाबतच्या वक्तव्यावरून वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी भाजपला घेरले आहे. त्यांनी संघ, भाजप अन् अमित शाह यांच्यावर घणाघाती टीका केली. भाजप आणि संघाचे जे काही जुने प्लॅन आहेत ते आता अंमलात आणण्यासाठी बाबासाहेब आंबेडकर अडकर आहेत, असा दावा प्रकाश आंबेडकरांनी केला.

अमित शहा यांनी बाबासाहेब आंबेडकरांबाबत केलेल्या विधानामुळे राजकारण चांगलेच तापले आहे. विरोधकांकडून भाजपवर टीका केली जात आहे. अमित शहा यांच्या वक्तव्यावरून भाजपला बाबासाहेबांचा द्वेष असल्याचे सिद्ध झाल्याचे विरोधक म्हणत आहेत. त्यात आता प्रकाश आंबेडकर यांनीही भाजपवर हल्लाबोल केला आहे.

भाजपचे जुने प्लॅन अंमलात आणण्यासाठी त्यांना काँग्रेस पक्ष अडसर नसून बाबासाहेब आहेत. त्यामुळेच त्यांचा जळफळाट होत आहे. तोच जळफळाट त्यांच्या वक्तव्यातून बाहेर आला, अशी जहरी टीका प्रकाश आंबेडकरांनी केली. भाजप आता जन्माला आला आहे. त्यांच्या आधी जनसंघ होता. त्याच्या आधी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ होते. घटनेच्या कालखंडामध्ये सर्वात मोठा विरोध बाबासाहेबांना कोणी केला असेल, तर तो या संघटनेने केला, असा दावाही प्रकाश आंबेडकरांनी केला. लोकसभेत अमित शाह यांनी जे वक्तव्य केले, त्यातून त्यांची जुनी मानसिकता बाहेर पडली, असेही ते म्हणाले.

प्रकाश आंबेडकर यांनी बांगलादेशात होत असलेल्या हिंदुवरील अत्याचाराबाबातही भाष्य केले. बांगलादेशच्या नाड्या आवळणे गरजेचे आहे. केंद्रात तुमची सत्ता आहे. त्यामुळे आपण त्यांना वीज देत आहोत, ती बंद करा, असे आवाहन प्रकाश आंबेडकरांनी केंद्र सरकारला केले. एकदा नियंत्रण सुटल की खालपर्यंत नियंत्रण सुटते, असेही ते म्हणाले.

## महाराष्ट्र काँग्रेसमध्ये होणार मोठे फेरबदल

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीतील हाराकिरीनंतर महाराष्ट्र काँग्रेसमध्ये मोठे फेरबदल होण्याची शक्यता आहे. त्यानुसार दिवंगत माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे सुपुत्र अमित देशमुख यांची प्रतोदपदी नियुक्ती होण्याची शक्यता आहे. तर काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदासाठी बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, सुनील केदार आदी ५ बड्या नेत्यांची नावे चर्चेत आहेत.

विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा दारूण पराभव झाला. त्यामुळे त्यामुळे विद्यमान काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आपले पद सोडण्याची इच्छा व्यक्त केली आहे. त्यामुळे त्यांच्या जागी कुणाची वर्णी लागणार? असा प्रश्न काँग्रेसच्या गोटात चर्चिला जात आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या पक्षसंघटनेत मोठे फेरबदल होणार आहे. यासंबंधीच्या वृत्तानुसार, महाराष्ट्र काँग्रेसमधील संभाव्य फेरबदलात दिवंगत माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे सुपुत्र अमित देशमुख यांची प्रतोदपदी नियुक्ती होण्याची शक्यता आहे. तर विश्वजीज कदम, यशोमती ठाकूर, सुनील केदार, विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात यांच्या नावाचा प्रदेशाध्यक्षपदासाठी विचार सुरू आहे.

दुसरीकडे, नाना पटोले यांनी प्रदेशाध्यक्षपद सोडण्याची तयारी दाखवली असली तरी त्यांनी आता विधिमंडळातील गटनेतेपदासाठी आग्रह धरला आहे. पण त्याला काँग्रेसच्या इतर नेत्यांकडून विरोध केला जात आहे. विजय वडेट्टीवार यांनी नुकतेच तसे संकेत दिलेत. नाना पटोले यांना विधिमंडळ गटनेता करण्याची चर्चा मी ऐकली नाही. यासंबंधीचा कोणताही निर्णय हायकमांड घेईल. १७ तारखेला आमचे प्रभारी येत आहेत. त्यांच्यासोबत चर्चा होईल. त्यामुळे हा निर्णय नाना पटोले किंवा विजय वडेट्टीवार यांचा स्वतःचा नाही, असे वडेट्टीवार म्हणाले होते.

## नरेंद्र मोदींनी तात्काळ सत्ता सोडावी : उद्धव ठाकरे



**मुंबई :** भारतीय जनता पक्षाचे नेते कायम महाराष्ट्राचा आणि महाराष्ट्रातील महापुरुषांचा अपमान करतात. तो अपमान आता सहनशीलतेच्या पुढे गेला असल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी उर्मटपणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख केला आहे. असा आरोप ठाकरे यांनी केला आहे.

त्यामुळे भाजप आणि नरेंद्र मोदी यांनी तात्काळ सत्ता सोडावी अशी मागणी ठाकरे यांनी केली. इतकेच नाही तर अमित शहा यांचे वक्तव्य देखील ठाकरे यांनी प्रसार माध्यमांसमोर ऐकवले.

या आधी देखील भाजपने शिवरायांच्या पुतळ्यात भ्रष्टाचार करून शिवरायांचा अपमान केला असल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी देखील फुलेंचा अपमान केला होता. मात्र, भाजपने त्यांना माफी मागायला लावली नाही, असे देखील उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. आता मला रामदास आठवले काय भूमिका घेतात? हे पाहायचे असल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे.

आमच्या मधून जे नेते गेले, अजित पवार गेले आहेत, त्यांना देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान मान्य आहे का? असा प्रश्न उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला. या माध्यमातून भाजपचा बुरखा फाटला असल्याचे देखील उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. या संदर्भात भारतीय जनता पक्ष आणि संघाने देखील याचा खुलासा करायला हवा. हे त्यांनीच अमित शहा यांच्याकडून बोलवून घेतलेय का? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला.

भारतीय जनता पक्ष अमित शहा यांच्यावर काही कारवाई करणार आहे का? असा प्रश्न देखील ठाकरे यांनी उपस्थित केला. आता तरी महाराष्ट्र आणि देशाने शहाणे झाले पाहिजे, असे देखील उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. ज्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला संविधान दिले. त्यांच्याविषयी अमित शहा असे कसे बोलू शकतात? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला. त्यामुळे आता भाजप, अमित शहा आणि मोदींना सत्तेवर राहण्याचा अधिकार नाही. त्यामुळे नरेंद्र मोदी यांनी आता सत्ता सोडावी, असे देखील उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे.

या संदर्भात आम्ही आंदोलन करणाच आहोत. मात्र, इतर सामान्य जनतेला हे मान्य आहे का? असा प्रश्न ठाकरे यांनी उपस्थित केला. आपल्याला पाशवी बहुमत मिळाले असल्याने महाराष्ट्राला कसेही वाकवता येते, अशा मस्तीमध्ये भाजप नेते वागत असल्याचा आरोप त्यांनी केला. त्यामुळे अशा नेत्यांवर भारतीय जनता पक्ष काय कारवाई करणार? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

त्यामुळे आता भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांना जनतेने प्रश्न विचारायला हवा, असे देखील ठाकरे यांनी म्हटले आहे. आंबेडकर हे कोणत्या एका पक्षांचे नव्हते, तर ते सर्वांचे होते. माझे आजोबा आणि त्यांचे चांगले संबंध होते, असा दावा देखील उद्धव ठाकरे यांनी केला आहे.

अमित शहा हे एवढे मोठे धाडस करणार नाही. त्यांना संघाने हे बोलण्यास सांगितले असल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे.

घटनाकारांचा अपमान करणाऱ्यांना भाजप संरक्षण देत आहे का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. नेहरू नेहरू करता करता आता भाजप आंबेडकरांवर देखील आले असल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. त्यामुळे आता रामदास आठवले राजीनामा देणार का? असा प्रश्न ठाकरे यांनी उपस्थित केला. भाजप आंबेडकरांचे नाव पुसायचा प्रयत्न करत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. मोदी- मोदी करून शहा यांना स्वर्ग मिळेल का? असा प्रतिप्रश्न देखील ठाकरे यांनी उपस्थित केला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १९ डिसेंबर २०२४

## विविध स्पर्धा परीक्षांचे वेळापत्रक महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध

**पुणे** - महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २०२५ मध्ये नियोजित विविध स्पर्धा परीक्षांचे वेळापत्रक आयोगाच्या mpsc.gov.in व mpsconline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले असल्याची माहिती आयोगाचे अवर सचिव र.प्र. ओतारी यांनी कळविली आहे.

शासन सेवेतील विविध पदांच्या भरतीसाठी आयोगामार्फत वर्षभर विविध परीक्षांचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार सन-२०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या परीक्षांच्या तारखा निश्चित करण्यात आल्या आहेत. हे वेळापत्रक निश्चित करताना संघ लोकसेवा आयोग, विविध विद्यापीठे, परीक्षा घेणाऱ्या इतर संस्था यांच्याकडून आयोजित करण्यात येणाऱ्या परीक्षांचे वेळापत्रक विचारात घेऊन आयोगाच्या परीक्षांचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. आयोगाच्या व विविध संस्थांच्या परीक्षा एकाच दिवशी आल्याने उमेदवारांचे नुकसान टाळण्यासाठी आयोगाच्या वेळापत्रकाची प्रत संबंधित संस्थांना पाठवून याबाबत दक्षता घेण्याबाबत कळविण्यात आले आहे.

## डॉ. होमीभाभा यंग सायंटिस्ट परिक्षेत तन्मय थोरातचे यश



**कन्नड (अरुण थोरात):** कळंकी ता. कन्नड येथील भूमीपूत्र तन्मय हरि थोरात या विद्यार्थ्याने डॉ होमीभाभा यंग सायंटिस्ट परिक्षेत घवघवीत यश मिळविले असल्याने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

तन्मय थोरात हा बजाजनगर, संभाजीनगर येथील आर्किड इंग्लिश स्कूल चा विद्यार्थी असून त्याच्या समवेत या शाळेतील १२५ विद्यार्थ्यांनी ही हे यश मिळविले आहे.

विशेष म्हणजे यापैकी १२ विद्यार्थी हे प्रॅक्टिकल राउंड साठी पात्र ठरले आहेत. यात तन्मय थोरात, साई बानारसे, श्रावणी सोनावणे, हर्षल खोबरे, ईश्वरी चौधरी, अमेया वाकडीकर, अदिती लंबे, वेदांत सुर्यवंशी आदींचा समावेश आहे.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्रीनिवास नंदमूरी, प्रशासकीय अधिकारी अंजूम शेख, मुख्याध्यापिका रेणुका काकडे आदींनी अभिनंदन केले आहे.

## जेईएस चे माजी प्राचार्य डॉ. रमेश अग्रवाल यांचे निधन



**जालना (प्रा. राजेंद्र सोनवणे) :** जे ई एस महाविद्यालय जालनाचे माजी प्राचार्य डॉ.रमेश अग्रवाल यांचे आज दि. १८ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १०:४५ वाजता दुःखद निधन झाले, त्यांना जालना एज्युकेशन सोसायटी व जे ई एस महाविद्यालय जालना, तर्फे महाविद्यालयाच्या मध्यवर्ती सभागृहात श्रद्धांजली वाहण्यात आली.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री व उपप्राचार्य प्रा. प्रवीण बाफना पर्यवेक्षक सुमंत बिक्कड, पर्यवेक्षिका प्रा. करुणा वासनिक तसेच महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रा. डॉ. रमेश अग्रवाल हे जे ई एस महाविद्यालयात भौतिकशास्त्र विषयाचे प्राध्यापक होते, नंतर १६ वर्ष प्राचार्य म्हणून त्यांनी काम केले होते. सेवानिवृत्त झाल्यानंतरही समाजकार्यात त्यांचा सहभाग उल्लेखनीय होता. त्यांच्या या दुःखद निधनाबद्दल महाविद्यालयातर्फे शोक व्यक्त करण्यात आला.

## परभणी येथील पोलिस निरीक्षक अशोक घोरबांड यांच्या विरोधात आंबेडकरी जनतेचे तीव्र आंदोलन




**छत्रपती संभाजीनगर :** परभणी येथे १० डिसेंबर रोजी संविधानाच्या प्रतिकृतीची तोडफोड करून विटंबना करण्यात आली. त्यामुळे महाराष्ट्रातील आंबेडकरी समाज संतप्त झाला आहे. या संतापाची प्रतिक्रिया म्हणून ११ डिसेंबर रोजी आंबेडकरी समाजाच्या वतीने बंद पाळण्यात आला होता.

बंदच्या काळात परभणी शहरातील कायदा व सुव्यवस्था स्थिती नियंत्रणात राखण्यासाठी पोलिसांकडून कोणतेही विशेष प्रयत्न अथवा खबरदारी घेण्यात आली नाही. परिणामी परिस्थिती हाताबाहेर गेली. पोलिस निरीक्षक अशोक घोरबांड हे परभणीतील हिंसाचार आणि कायदा व सुव्यवस्था स्थिती बिघडण्यास जबाबदार आहेत, अशी आंबेडकरी जनतेची धारणा झाली आहे.

बंदनंतर परभणी पोलिसांनी कोबिंग ऑपरेशनच्या नावाखाली आंबेडकरी तरूणांवर गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल करून त्यांना अटक करून त्यांचे भवितव्य उद्धवस्त केले जात आहे. पोलिसांच्या या दंडेलशाहीचा निषेध म्हणून विभागीय आयुक्त कार्यालयासमोर महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या वतीने पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहूल जी. वडमारे यांच्या नेतृत्वाखाली सर्व संविधानप्रेमी जनतेच्या वतीने तीव्र आंदोलन, निदर्शने करण्यात आली.

या आंदोलनात आंबेडकरी जनतेच्या वतीने काही मागण्या मांडण्यात आल्या १. सोमनाथ सूर्यवंशी या तरूणाच्या मृत्यूस जबाबदार धरून पोलिस निरीक्षक अशोक घोरबांड यांना तत्काळ निलंबित करून त्यांच्याविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा. २. सोमनाथ सूर्यवंशीच्या कुटुंबियांना शासकीय निधीतून ७५ लाख रुपयांची मदत तातडीने द्या. ३. कोबिंग ऑपरेशनच्या नावाखाली परभणी पोलिसांनी निष्पाप लोकांविरुद्ध दाखल केलेले सर्व गुन्हे तत्काळ मागे घ्या. ४. संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना करण्यामागचे मुख्य सूत्रधार शोधून काढून त्यांना फाशीची शिक्षा द्या.

या मागण्या तातडीने शासन दरबारी पोहोचून त्यांचा पाठपुरावा करण्यात यावा अन्यथा महाराष्ट्रातील आंबेडकरी समाज रस्त्यावर उतरून लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन पुकारण्याचा आंबेडकरी जनतेकडून शासनास इशारा देण्यात आला.

या आंदोलनात राहुल वाडमारे - जिल्हाध्यक्ष रतन जाधव- जिल्हा संघटक बापूसाहेब चाबुकस्वार- जिल्हा सचिव अलकाताई जाधव - महिला जिल्हाध्यक्ष राजेंद्र जाधव - शहर सचिव भाऊसाहेब चव्हाण, स्वाती घुसळे, मायाताई जाधव, गणेश साबळे, करण साबळे, अक्षय चाबुकस्वार, बाळू गायकवाड, रमेश साळवे, लीलाताई वेलदोडे यासोबतच बहुसंख्य आंबेडकरी जनता उपस्थिती होती.

## "वरून आंबेडकरवादी"



**कवी**
**प्रो. डॉ.बाळासाहेब लिहिणार**
**मो. ९४२१२ ४५३०९**

"वरून आंबेडकरवादी
आतुन मनुवादी"
मिळेल गल्लो गल्ली.

"वरून विज्ञानवादी
आतून धर्मवादी"
मिळेल पदोपदी.

"वरून पुरोगामित्वाचा टेंभा
आतून प्रतिगामित्वाचा वावर"
दिसेल क्षणोक्षणी

वरून स्वाभिमानाची भाषा
आतून हुजरेगिरीची लय
दिसेल ठिकठिकाणी.

वरून भ्रष्टतेला शिव्या
आतून भ्रष्टतेचा मुक्त संचार
कळेल जागोजागी.

वरून प्रज्ञा, शील, करुणे चा पुरस्कार
आतून गलिच्छ करणी
कळेल करणीतून.

आंबेडकरवादी, विज्ञानवादी,
पुरोगामी हा दिखावा आहे
सावधान आजूबाजूला प्रतिगामी, लाचारी, हुजरेगिरी
करणाऱ्यांचा सुप्त वावर आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १९ डिसेंबर २०२४

# सुधीर रसाळ यांना साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर




**मुंबई :** साहित्य अकादमीच्या वतीने दिला जाणाऱ्या वार्षिक पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून यामध्ये ज्येष्ठ समीक्षक सुधीर रसाळ यांचा नावाचा देखील समावेश करण्यात आला आहे. 'विंदांचे गद्यरूप' या सुधीर रसाळ यांनी लिहिलेल्या पुस्तकाला हा पुरस्कार जाहीर झाला आहे.

तर्थतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, बा. सी. मर्ढेकर यांना मिळालेला सर्वोच्च पुरस्कार मला मिळाला म्हणत सुधीर रसाळ यांनी दिव्य मराठी डिजिटलशी बोलताना आनंद व्यक्त केला. मराठी भाषेला याच वर्षी अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. त्यात आता सुधीर रसाळ यांच्या माध्यमातून मराठी भाषेचा पुन्हा एकदा देश पातळीवर गौरव करण्यात आला आहे.

साहित्य अकादमीच्या वतीने वार्षिक साहित्य अकादमी पुरस्कार २०२४ ची घोषणा करण्यात आली. या पुरस्कारांमध्ये आठ काव्यसंग्रह, तीन कादंबऱ्या, दोन कथासंग्रह, तीन निबंध, तीन साहित्यिक समीक्षा, एक नाटक आणि एका संशोधनात्मक पुस्तकाचा समावेश आहे. बंगाली, डोगरी आणि उर्दू भाषेतील पुरस्कार नंतर जाहीर केले जाणार आहेत. २१ भारतीय भाषांच्या निवड समित्यांनी या पुरस्कारांची शिफारस केली होती आणि आज साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या अकादमीच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत त्यांना मान्यता देण्यात आली.

हे पुरस्कार पुरस्कार वर्षाच्या गेल्या पाच वर्षांत (म्हणजे १ जानेवारी २०१८ ते ३१ डिसेंबर २०२२ दरम्यान) प्रथमच प्रकाशित झालेल्या पुस्तकांना दिले जातात. ८ मार्च २०२५ रोजी नवी दिल्ली येथे आयोजित एका भव्य समारंभात हे पुरस्कार प्रदान केले जातील. ताम्रपट, शाल आणि १ लाख रुपयांचा पुरस्कार पुरस्कारार्थींना प्रदान केला जाणार आहे.

हा सर्वात श्रेष्ठ पुरस्कार असल्याचे मी मानतो. आणि तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी. बा. सी. मर्ढेकर, प्रभाकर पाध्ये अशा फार मोठ्या विचारवंत समीक्षकांना जो पुरस्कार मिळाला, तो मलाही मिळतो आहे. याचा मला विशेष आनंद असल्याचे सुधीर रसाळ यांनी 'दिव्य मराठी' बोलताना म्हटले आहे.

## निवडणुकीपूर्वी-निवडणुकीनंतर आपले महापुरुष, देव बदलणे भाजपची फॅशन : विजय वडेट्टीवार



**मुंबई :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी राज्यसभेत संविधानावरील चर्चेदरम्यान मंगळवारी एक टिप्पणी केली. परंतु, ही टिप्पणी आता वादात अडकली आहे. या टिप्पणीवरून कॉंग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी जोरदार टीका केली आहे. निवडणुकीपूर्वी - निवडणुकीनंतर आपले महापुरुष आणि देव बदलणे ही भाजपची फॅशन असल्याचे विजय वडेट्टीवार म्हणाले.

आजकाल आंबेडकरांचे नाव सारखे सारखे घेणे ही फॅशन झाली आहे. आंबेडकर, आंबेडकर, आंबेडकर असा जप काही लोक करत असतात. एवढ्या वेळा जर देवाचे नाव घेतले असते, तर सात जन्मांसाठी स्वर्ग मिळाला असता, असे विधान अमित शहा यांनी केले होते. आंबेडकरांचे नाव तुम्ही १०० वेळा जरी घेतले, तरी तुम्हाला आंबेडकरांविषयी काय वाटते, हे मी सांगतो, असेही अमित शहा म्हणाले. त्यांच्या विधानामुळे आता नवीन वादाला तोंड फुटले आहे.

कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी अमित शहा यांच्या विधानावरून भाजपवर निशाणा साधला आहे. निवडणुकीपूर्वी - निवडणुकीनंतर आपले महापुरुष आणि देव बदलणे ही भाजपची फॅशन असल्याची टीका वडेट्टीवार यांनी केली. भारतरत्न डॉ.आंबेडकर यांनी भारतात समतेचा स्वर्ग निर्माण केला, त्यामुळे आम्ही आंबेडकरांचे नाव घेतो आणि घेत राहणार, असे ते म्हणाले. सामान्य जनतेला आपले अधिकार आणि हक्क देणाऱ्या संविधान निर्माते बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेणे ही सन्मान आणि अभिमानाची गोष्ट आहे, असेही विजय वडेट्टीवार म्हणाले.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274 ,8956362639 , 9270446603 , 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक
या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य
Sanitary Health Inspector
सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर
या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903